Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 1.7604(UIF)
Volume-2, Issue- 12, Jan -2013 Available online at www. isrj.org

# भटक्या जातीजमातींचा युगधर्म

**प्रा.डॉ.दिपक रिटे**
**विज्ञान महाविद्यालय मराठी विभाग सांगोला, जि.सोलापूर.**

**प्रस्तावना:**

जाती आणि जमाती हया अज्ञान व अंधश्रध्दा या कारणाने वर्षानुवर्षे भटकंती करीत आल्या आहेत. परंपरेचा प्रभाव त्यांच्या मनावर खोलवर प्रतिबिंबित झाल्या कारणाने ते आपले पारंपारिक जीवन नाकरण्यास सहजासहजी तयार होत नाहीत. उपजत असणारे व्यवसाय, कला हे त्यांच्या जगण्याचे अविभाज्य अंग बनले आहे. त्यामुळेच ते संस्कृती, परंपरा याला कवटाळून बसले आहेत. अस्पृश्य जीवन त्यांच्या वाटयाला आलेले असल्याने जगण्यातील कारुण्य, व्यथा आपल्या सांस्कृतिक जीवनातून व्यक्त करतात. गुन्हेगारीचं, अस्पृश्याचं जगणे जगणा-या जातीजमाती संदर्भात १३ ऑगस्ट १९५२ रोजी शासनाने गुन्हेगार कायदा रद्द केला. हा कायदा रद्द करण्यासाठी अनेक जातीजमातींनी संघटना निर्माण केल्या. संघटनेतून हक्क, न्यायासाठी संघर्ष, आंदोलने, सामाजिक चळवळी उभारल्या. आपल्या अस्तित्वाची दखल सरकारी यंत्रणेला घेण्यास भाग पाडले. जातीजमातींच्या ऐक्यातून अहिंसा मार्गाने केलेली आंदोलने महत्त्वाची ठरली. अनेक जातीजमाती कायद्यातून मुक्त झाल्या असल्यातरी त्यांची अवस्था व्यवस्थेत दोर तुटलेल्या पतंगासारखी झाली आहे. व्यवस्थेचा प्रभाव असलेल्या या लोकांना स्वातंत्र्यातही चोर, गुन्हेगार म्हणून ओळखले जावू लागले. साधनहीन असलेल्या या लोकांना प्रतिष्ठेचा मार्ग मिळाला नाही. कावेबाज लोकांनी त्यांच्या अगतिकतेचा फायदा घेऊन त्यांना चो-यामा-या करण्यास भाग पाडले. गुन्हेगारीचा कलंक लागल्यामुळे हे लोक सन्मानाने व स्वावलंबनाने जीवन जगण्यास असमर्थ ठरले. उपजिविकेसाठी पशुपक्षांसह रानोमाळ भटकंती करणा-या या जमाती गुण्यागोविंदाने नांद होत्या. ज्ञान, संसाधने, कलांमध्ये निपुण असणा-या, अद्यात्मक करमणूक करीत लोकांना सदाचार व नीतीची शिकवण देत फिरु लागल्या. ‘वैदू’ सारखी जमात लोकांच्या आरोग्याची काळजी घेत नाडी परीक्षेवरुन रोगनिदान करणारा जडीबुटीचे औषध देणारा, भविष्य कथन करणारे, जंगलात शिकार करणारे या लोकांच्या जगण्याला आधुनिकतेचे ग्रहण लागले. त्यांच्या असणा-या पारंपारिक कला, व्यवसाय बंद पडले. सिनेमा, नाटयगृह, टी.व्ही. व आधुनिक यंत्रसामग्री इत्यादिमुळे भटक्या जातीजमातींच्या कला दुबळया ठरल्या. जगण्यासाठी त्यांना परिस्थितीनुरुप बदलावे लागले. त्यांना काळाचे भान आले. स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली. त्यांना जगण्यातून आत्मभान आल्याने शिक्षणासारख्या मूलभूत गरजेच्या प्रयत्नासाठी ते धडपड करु लागले. या त्यांच्या आधुनिक मूल्य जोपासण्याच्या कृतीमुळे पारंपारिक व्यवसाय बंद पडले, बंद केले, प्रस्थापितांनी हजारो वर्षे नाकारलेल्या जीवनाला संघटना, आंदोलन, मोर्चा यांनी विद्रोही भाषेत विरोध केला. हे त्यांचे स्वातंत्र्योत्तर आत्मभानाचे, स्वत्वाचे, जाणीवतेचे जगणे म्हणजे भटक्या जातीजमातींचा असणारा युगधर्म आहे.

अनेक जातीजमाती परंपरा नाकारुन अंधश्रध्दा झिडकारुन, कायदे, नियम बाजूला ठेवून परिवर्तनवादी दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून जगतात. ‘चर्मकार’ समाज याने खेडयापाडयात शेतीचा व्यवसाय सुरु केला आहे. तर काही लोक नोकरी धंदयानिमीत्त शहरात स्थायिक होऊन छोटे मोठे व्यवसाय, दुकानदारी करीत आहेत. परिस्थितीची व अस्तित्वाची जाणीव झालेला ‘मेहतर’ समाज म्हणतो, “भंगी व्यवसाय आम्ही पिढयानपिढया करीत आलोय, सर्व जातीधर्म, जातीच्या लोकांचं मलमूत्र काढतो आहोत. आता हे काम अन्य समाजाने करावे”. (१) यासारखा बदल ‘मेहत’ समाजात होऊ लागला आहे.त्याला आपल्या कामाची व स्वतःच्या अस्तित्वाची ओळख झाल्यामुळे तो वर्णव्यवस्थेच्या विरोधात बोलण्याचे धाडस करीत आहे. तर ‘ढोर’ समाजातील तरुण मंडळी सामाजिक व राजकीय चळवळीतून समाजाचे वेदनामय दुःख मांडून त्याला वाचा फोडत आहेत. समाजामध्ये नव्याने राजकीय नेतृत्व उदयाला येऊ लागले आहे.

'बुरुड' आणि 'पद्मशाली' समाज गेल्या अनेक वर्षापासून समाजातील अनिष्ठ प्रथा, परंपरा, अंधश्रध्दा, लग्नातील विडापध्दत आणि तडे पध्दत नाहीसे करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याने पारंपारिक व्यवसायाबरोबर नविन छोटे मोठे व्यवसाय आपल्या मर्जीप्रमाणे स्वीकारले आहेत. 'कोल्हाटी' समाजातील स्त्रिया पारंपारिक कसरतीचे खेळ करण्यापेक्षा नाचगाणी, संगीतबा-या, तमाशाच्या पाटर्या नव्याने उभ्या करुन आपला उदरनिर्वाह करीत आहेत. 'कुडमुडे जोशी' ''प्रामुख्याने समाजातील तरुणांनी समाजातील मैतीच्या वेळची विडापध्दत किंवा देवात मिसळण्याची पध्दत, बकरी कापण्याची पध्दत, लगन घडा देण्याची या सर्व पध्दती बंद केल्या आहेत''. (२) या समाजाने अंधश्रध्दा व पारंपारिकप्रथा बंद केल्या आहेत. समाजाच्या व व्यक्तीविकासाच्या आड येण्या-या धार्मिक रुढी समाजातील तरुणांच्या पुढाकाराने बंद केल्याचे समाजातील जाणकार मंडळी अभिमानाने सांगतात. 'घिसाडी' समाज अघोरी अंधश्रध्दा, परंपरा नष्ट करण्यासाठी समाजातील अनेक तरुण प्रयत्न करीत आहेत. परंतु जुनी जाणती मंडळी त्याला साथ देत नाहीत. यातूनच समाजात सुधारणावादी आणि परंपरावादी असे दोन गट निर्माण झाले आहेत. असे असले तरी समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने चाललेला हा बदल महत्वाचा आहे हे नाकारता येणार नाही. 'वेडू वाघरी' समाजात मोठ्या प्रमाणात बदल झालेला नाही. या समाजाचा कुटुंबनियोजनावर विश्वास नाही. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात समाजातील तरुण मुलांवर वातावरणाचा परिणाम होऊन ते सुधारण्यासाठी प्रयत्न करीत आहे. पारंपारिक व्यवसायातून मुक्त होऊन तो शहरात स्थलांतर करु लागला आहे. परिस्थीतीचे भान ठेऊन छोटे, मोठे व्यवसाय करीत आहे. तो मुलांना शाळेत, महाविद्यालयात पाठवित आहे. घ्योरे, बेलदार, टकारी, रजपूत भामटा या समाजाने अनिष्ठ प्रथा, परंपरा यांचा त्याग करुन नवीन व्यवसाय स्वीकारला आहे. समाजातील तरुण मुले उच्चशिक्षण घेऊन चांगल्या सरकारी उच्चपदावर विराजमान झालेले दिसतात. तसेच जातीजमातींचा सामाजिक दर्जा उंचवण्यासाठी सामाजिक संघटना निर्माण करुण राजकिय पक्षाचे लक्ष समाजाकडे आकर्षित करुन घेतात. तर काही मंडळी राजकारणामध्ये सहभाग घेऊन समाजामध्ये आधुनिक मुल्यांची जोपासना करीत आहे. परंतु पराकोटीचे दारिद्र्य, टोकाची अंधश्रध्दा, शिक्षणाचा अभाव यामुळे ते एकत्रित येण्यास अनेक अडचणी येत आहेत. मात्र तरुणांमुळे वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून, राजकिय सहकार्याने समाजामध्ये परिवर्तनवादी विचार येत आहेत. दुःख, दैन्य, दास्य, अंधश्रध्दा यामध्ये बुडालेला 'मांगगारुडी' समाज शहरामध्ये स्थिर होऊ लागला आहे. त्याने पारंपारिक व्यवसाय सोडून नवीन व्यवसाय स्वीकारले आहेत. तो शहरातील वेगवेगळ्या कारखान्यात व नगरपालिकेत चतुर्थ श्रेणीत काम करुन आपला सामाजिक दर्जा उंचवित आहे. 'कंजारभाट', 'पारधी' या समाजाला सामाजिक परिवर्तनाची जाणीव होऊ लागली आहे. ''आज पारधी समाज थोडयाफार प्रमाणात जागृत होऊ पाहतोय, त्यांना स्थिर जीवन हवे आहे. गुन्हेगार वृत्ती, वाईट रुढी, परंपरा सोडण्याचे ते प्रयत्न करीत आहे''. (३) अनेक जातीजमाती आपल्यावर मारलेला गुन्हेगारीचा शिक्का पुसण्याचा प्रयत्न करीत आहेत. पारंपारिकमूल्य सोडून देत आहेत. ते माणूस म्हणून जगण्यासाठी धडपड करीत आहेत. परंतू प्रस्थापितवादी मंडळी त्या जातीजमातींचा स्वीकार करण्यास तयार नाहीत. या संदर्भात नानासाहेब गोरे म्हणतात. ''दलित भटक्या समाजातील तरुणांची आत्मकथने चवीने नवा पदार्थ खाल्यासारखी आपण वाचतो कीं, त्यामुळे आपले डोळे खरेच उघडतात ? ती वाचताना आपण खरोखर हादरुन जाता का ? त्यांना शतकानुशतके पाणवठा, शाळा, देऊळ येथे जी वागणूक मनूच्या आज्ञेमुळे समाजाने दिली. तशी तुम्हाला-मला मिळाली असती तर या देशावर आपण प्रेम केले असते का ? आज या लोकांना तुम्ही-आम्ही सदाशिव पेठेत राहायला जागा देऊ का , असा प्रश्न विचारीत ते पुढे म्हणाले आपण भले २१ व्या शतकात जाण्याची भाषा करीत असू, हा वर्ग आजही ८/९ व्या शतकातच आहे कीं काय, अशी मला शंका येते ! शाळा, आरोग्य, निवास हे त्यांचे प्रश्न तसेच आहेत. त्यांना चोरी केल्याशिवाय, भीक मागितल्याशिवाय जगता येईल ही परिस्थिती आपण निर्माण केलेली नाही. हे शेकडो वर्षाचं सामाजिक आव्हान आहे. या समाजाशी आपण मिसळलं पाहिजे. भटक्या मुलांना, मुलींना तुम्ही-आम्ही घरी आणून शिकवून संस्कारित करुन यासमाजाशी एकरुप करण्याचे काम केले पाहिजे'' (४) भटक्या समाजामध्ये परिवर्तन होत आहे. परंतू सवर्णवाद्यांनी आपल्या मानसिकतेमध्ये बदल करुन त्यांना आपले म्हणून स्वीकारले पाहिजे. त्यांना सवातंत्र, समता, बंधूता व न्याय दिला पाहिजे. त्यांचा माणूस म्हणून विचार केला पाहिजे. माणूस म्हणून जगवले पाहिजे असा आशावाद रामनाथ चव्हाण व्यक्त करतात.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये सर्वच क्षेत्रात बदल झाला आहे. शिक्षणाचे सार्वत्रिककरण, संघटना, संस्था, आंदोलने यांच्या प्रभावामुळे दलित, पीडीत, शोषित, वंचीत यांच्यामध्ये परिवर्तनाची लाट निर्माण झाली. त्यांनी पारंपारिक कल्पना यांना जीवनातून हद्दपार केले. आधुनिक मूल्य जोपासली, न्यायासाठी, हक्कासाठी ते संघर्ष करु लागले. स्वतःच्या अस्तित्वासाठी त्यांची चाललेली ही धडपड त्यांना परिवर्तनाच्या दिशेने घेवून जाणारी आहे. 'गोसावी' समाज याने दाढी, केस, रुद्राक्षाच्या माळा आणि भगव्या कपडयाचा त्याग केला

आहे. तो एका ठिकाणी स्थिर होऊन वेगवेगळे व्यवसाय करीत आहे. 'नाथपंथी डवरी', 'माती वडार', ' गाडी वडार', 'गाडी लोहार', या जातीजमाती परंपरेच्या ओझ्याखाली जगत असलातरी त्यांना समाजात वास्तवाचे व शिक्षणाचे महत्त्व कळले आहे. सहाजिकच तेही स्थिर जीवनाचा शोध घेत आहेत. 'रायरंद' समाज याला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव झाली आहे. मुलाबाळांना शिकवावे, त्यांना चांगल्या नोक-या मिळाव्यात, समाजामध्ये मानसन्मान मिळावा असे वाटते, त्यामुळे त्यांच्या मनामध्ये परिवर्तनवादी विचार आला आहे. ''पूर्वाश्रमीच्या महार समाजाने बौध्द धर्म स्वीकारला, पूर्वीच्या रुढी, परंपरा त्यांनी सोडल्या. पूजा आर्चा आणि श्रध्दास्थाने बदलली. बौध्द म्हणून ते जगू लागले. तेंव्हा त्यांच्या पावलावर पाऊल टाकीत रायरंदानीही बौध्द धर्म स्वीकारलाय''. (५) या समाजाने पारंपारिक, धार्मिक व सामाजिक कल्पनांचा त्याग करुन माणूस म्हणून जगण्यासाठी धडपड केली आहे. पूर्वीचं जगणं नाकारलं, 'मागतं' म्हणून असणारी अस्मिता बदलली आहे. आज तो महात्मा फुले, व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीने जगत आहे. त्यांच्या प्रेरणेने त्याला स्वतःच्या अस्तित्वाची ओळख झाली आहे. तो नव्या जाणीवेने आधुनिक मूल्य स्विकारीत आहे. तर बौध्दांना मिळणा-या सर्व सवलती यांचा उपभोग घेत आहे. आपल्या पारंपारिक जगण्यातून, दर्जातून, कलेतून, व्यवसायातून क्रांतीकारक परिवर्तन घडवणारा डोंबारी समाज दुःख, दैन्य, दास्य यांना विसरुन जगण्याच्या नव्या वाटा शोधत आहे. पिढयानपिढया दारिद्रय आणि अज्ञान हीच या समाजाची जमेची बाजू. पण अशाही अवस्थेत गावपातळीवर वेडयावाकडया उडया मारुन बघ्याचं मनोरंजन करणा-या डोंबा-याच्या मुलांची निवड देशपातळीवर जिमनॅस्टिक सारख्या खेळामध्ये झाल्याचे वाचून आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही''. (६) आपल्या वैशिष्टयपूर्ण उडया मारण्याच्या व्यवसायातून या समाजाने स्वतःची प्रगती केली आहे. तो आज देश व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धामधून आपल्या अस्तित्वाची ओळख करुन देत आहे. त्याने स्वतःचा आर्थीक स्तर उंचावून राजकीय क्षेत्रामध्येही वाटचाल करीत आहे. कठपुतली किंवा बाहुलीनाटय ही कला प्राचीन काळापासून जतन करणारा कठपुतलीवाला भाट यांच्या कलेची शासनाने दखल घेवून त्याला न्याय दिला आहे. ''हस्तकौशल्य प्रकार शासनाच्या लक्षात आल्याने १९६८ साली कला विभागात बाहुली नाटयाचा समावेश करुन प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या शिक्षकांना कठपुतलीचे शिक्षण देण्यासाठी या समाजातील श्री बाबुलाल कल्याणजी भट यांची सहाय्यक बाहुली नाटककार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे''. (७) यासारख्या पारंपारिक कलांमधून 'कठपुतलीवाला भाट' व 'डोंबारी' या समाजाने आपला आर्थीक स्तर उंचावलेला आहे. त्याला समाजामध्ये मान सन्मान व पुरस्कार मिळत आहे. त्याने सांस्कृतिक क्षेत्राबरोबर राजकीय क्षेत्रामध्येही आपले अस्तित्व दाखवलेले आहे. स्वतःच्या बदलाबरोबर त्याने समाजात बदल घडवून आणला आहे.

आता स्वतःच्या जगण्याला, भटकंतीला कंटाळा आलेल्या जातीजमाती स्थिर जगण्याचा शोध घेत आहेत. अपल्याला स्वतःची घरंदारं असावीत, मुलाबाळांना शिक्षण मिळावं, पोटासाठी मोलमजूरी मिळावी, प्रशासकीय सेवेत नोकरी मिळावी, मानसन्मानानं जगणं मिळावं असं मदारी, छप्परबंद, काकर, रम्मया, सिकलगार या समाजाला वाटू लागले आहे. आणि त्या दृष्टीने ते आपल्या जगण्यातील धार्मिकतेला, पारंपारिकतेला नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे. तो आधुनिक विचाराने व वैज्ञानिक दृष्टीने जगण्यासाठी वाटचाल करीत आहे.

भटक्या जातीजमातीच्या दुःखास कारणीभूत असणारी वर्ग, वर्णव्यवस्था यांना नाकारुन स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या विचारसररणीने जातीजमाती जगण्यास तयार झाल्या आहेत. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात केल्याने त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टी निर्माण झाली आहे. ते फुल-आंबेडकर यांच्या प्रेरणेने वाचन व लिखान करु लागले आहेत. सहाजिकच ते परंपरा नाकारुन विद्रोहाच्या भाषेत बोलू लागले आहेत. परिवर्तनास सज्ज झालेला मानवी समूह माणूस म्हणून जगण्यास इच्छुक आहे. म्हणूनच जगाला शांततेच्या मार्गाने घेऊन जाणा-या बौध्द धर्म व धम्माची दीक्षा देणा-या धर्मामध्ये धर्मांतर करु पाहत आहेत. त्यांच्या असणा-या युगधर्मासंदर्भात १६ डिसेंबर २००५ रोजी अनेक भटक्या जातीजमातींनी मुंबईच्या आझाद मैदानावर धम्म दिक्षा घेतली आहे. तर परिवर्तनाच्या, प्रबोधनाच्या दिशेने भटक्या जातीजमातींना घेवून जाणारे लक्ष्मण माने यांचा महात्मा गांधी, विजयादशमी दसरा व बौध्दजयंती २ ऑक्टोंबर २००६ रोजी बौध्द धर्मांतर हे जातीजमातींच्या आयुष्यात क्रांतीची नांदी ठरणारी वाटते. या दिवशी हिंदूच्या सर्व अमानवी रुढी, परंपरा, चालीरीती, देव,देवता, सण उत्सव, समारंभ नाकारुन भटका समाज माणूस म्हणून जगण्यासाठी सज्ज झाला आहे. तो शाहू-फुले-आंबेडकरी प्रेरणेने प्रेरित झाला आहे. तेंव्हा तो निश्चितच क्रांतीकारक वादळ घडवल्याशिवाय राहणार नाही अशी आशा आहे.

**संदर्भ सूची :-**


| अ.क्र | संदर्भ ग्रंथ | प्रकाशन वर्ष व आवृत्ती | पृष्ठ क्र |
|---|---|---|---|
| १. | रामनाथ चव्हाण 'जाती आणि जमाती'-मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथम आवृत्ती-१९८९ | | पूष्ठ-१४ |
| २. | उ. नि. | ---------वरीलप्रमाणे --------------- | पृष्ठ-४९ |
| ३. | उ. नि. | ---------वरीलप्रमाणे --------------- | पृष्ठ-१४४ |
| ४. | गोरे नानासाहेब- जाती जमातीचा समन्वय हवा. दै.लोकसत्ता २३ मार्च १९८९ | | |
| ५. | नामनाथ चव्हाण :- भटक्या विमुक्तांचे अंतरंग सुगावा प्रकाशन पुणे. प्रथम आवृत्ती १९८९ | | पूष्ठ-१०० |
| ६. | उ. नि. | ---------- वरीलप्रमाणे ------------- | पृष्ठ-१०६ |
| ७. | उ. नि. | ----------वरीलप्रमाणे -------------- | पृष्ठ १४६ |